PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 3, ISSUE 3

# आधुनिक संगीत विद्यार्जनामध्ये दृकश्राव्य ग्रंथालयांची आवश्यकता (Audio-Visual Library)

**श्री. जयभिम सूर्यभान शिंदे**
संशोधक विद्यार्थी,
संगीत विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
**महाराष्ट्र भारत**

भारतीय संगीताच्या विद्यार्जनाचे स्वरूप हे प्राचिन काळापासून वैयक्तिक–मौखिक प्रकारचे आहे. या विद्यार्जन पध्दतीला येथे धर्मपरिवर्तन, सत्तांतर, परकिय आक्रमणानंतर त्यांच्या शासनकाळात झालेले सांस्कृतीक, राजकिय, शैक्षणिक बदल या घटकांनी नेहमी प्रभावित केलेले आहे. या सगळया बाह्यतत्वांमूळे संगीताच्या विद्यार्जनाचा उद्देष देखिल विविध राजवटीत बदलत गेल्याचे दिसून येते. गुरूषिष्य परंपरा, गुरूकुल पध्दती, घराण्यातील विद्यार्जनाच्या काळात विद्यार्जन हे मुख्यता मौखिक स्वरूपात होत असे कारण प्राचिन काळात मुद्रणाची व्यवस्था उपलब्ध नव्हती, तर घराणा काळात विद्यार्जनाच्या बाबतीत अत्यंत गोपनियता बाळगली जायची त्यामुळे संगीताच्या लिखित विद्यार्जनाकडे संदेह पूर्वक पाहिले जात असे. विद्यादान आणि विद्यार्जनासाठी फक्त विषिष्ट घराण्यातच षिक्षा घ्यावी लागे त्यामूळे इतर घराण्यांचे गायन वादन ऐकण्यावर प्रतिबंध होते.

मात्र इंग्रजराजवटीच्या काळात घराण्यांची बंधने षिथिल झाली. वैयक्तिक स्वरूपातील विद्यार्जन संस्थात्मक, विद्यालयीन, विद्यापीठीय पातळीवर होऊ लागले. भारतीय ‘स्वरलिपी’ पध्दती याच काळाच विकसित झाली होती. तसेच औदयोगिक क्रांतीमूळे ध्वनिमुद्रण आणि ध्वनिप्रसारणाचे तंत्र आणि माध्यमे विकसित झाली होती.

घराण्याचे ज्ञान घराण्यातच रहावे हे सूत्र मागे पडत चालले होते. त्यामुळे अनेक संगीततज्ञ आपल्या गायनाचे ध्वनिमुद्रण करून त्याचा प्रचार–प्रसार संगीताच्या विकासासाठी व्हावा अषा प्रगतीवादी मतापर्यंत येऊन पोहोचले होते. यामध्ये प्रामुख्याने उ. अब्दूल करिम खॉ. साहेब यांचे नाव घ्यावे लागेल.

या नव्या तंत्रज्ञानाच्या आणि संगीताच्या मिलाफातून संगीत क्षेत्राला प्रचंड मोठी उपलब्धी निर्माण झाली आहे. भारतीय संगीताचे सूक्ष्म स्वरूप लिखित स्वरूपात मांडणे हे अत्यंत कठीण काम होते. आज उपलब्ध 'स्वरलिपी' देखिल विद्यार्जनाच्या या सूक्ष्म अभ्यासाच्या लिखाणाची योग्य मांडणी करण्यात काही प्रमाणात असमर्थ आहे असे दिसते.

यावेळी आपल्याकडे उपलब्ध असलेल्या आणि रोज नवनविन संषोधनाने विकसित होत जाणाऱ्या दृक–श्राव्य माध्यमांचा जर संगीताच्या विद्यार्जनात योग्य उपयोग केला तर संगीत विद्यार्जनातील बऱ्याच समस्यांचे योग्य निराकरण होवू शकेल असे वाटते.

दृक–श्राव्य माध्यमांच्या संगीतातील प्रवेषापासून ते आजपर्यंतच्या कालावधीत असंख्य ध्वनिफिती आणि चित्रफितीची निर्मिती झाली आहे. वेगवेगळ्या घराण्याच्या बुजूर्ग गायक, वादकांच्या सादरीकरणाला वेगवेगळ्या काळात तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जतन करण्यात आलेले आहे.

आजच्या संगित विषयक संस्था, विद्यापीठे, विद्यालये इ. च्या अभ्यासक्रमाषी संबंधीत शास्त्रीय संगीतातील वेगवेगळे गीत प्रकार यांचे दृकश्राव्य (Audio Visual) माध्यमातील साहित्य आज विपूल प्रमाणात उपलब्ध आहे. या संरक्षित केलेल्या संगीताच्या स्त्रोतांचा उपयोग जर विद्यार्जनात केला तर विद्यार्जन हे अचूक आणि प्रभावीपणे होण्यास नक्कीच मदत होईल असे वाटते.

तसेच जर देषपातळीवर विविध अभ्यासक्रमांसाठी पूरक अभ्यास म्हणून दृकश्राव्य पध्दतीचा सांगितीक संग्रह ऐकण्यासाठी आणि पाहण्यासाठीची स्वतंत्र ग्रंथालये निर्माण केली तर नक्कीच याचा फायदा विद्यार्थांना होईल. विद्यार्थ्यांना एकाचवेळी गुरू कडून मिळणारे

ज्ञान त्याचबरोबर उच्चकोटीच्या संगीतकारांच्या रचना ऐकण्यास आणि पाहण्यास मिळाल्या तर नक्कीच या विद्यार्थ्यांवर उच्चदर्जाच्या गायन–वादनाचा परिणाम हा सकारात्मक होइल असे वाटते.

याबाबतीत संषोधनाच्या निमित्ताने मुलाखती घेत असताना बऱ्याच विद्वानांनी सकारात्मक मते नोंदवली आहेत त्याचबरोबर असे मतही व्यक्त केले की या उच्चकोटीच्या ज्ञानाचे सामान्य विद्यार्थी रसग्रहण कसे करणार? तुमच्या समोर एखादे भांडार असताना त्यातून नेमके काय घ्यावे इतपत विद्यार्थ्यांची तयारी असणेही आवष्यक आहे. ही मते विचारात घेऊन पाहिले असता हे लक्षात घ्यावे लागेल की विद्यार्थ्यांला या संग्रहाचे रसस्वादन कसे करायचे याचे मार्गदर्षन त्याचे गुरू नक्कीच करू शकतात.

फक्त दृकश्राव्यमाध्यमातून विद्यार्जन नक्कीच शक्य नाही. मात्र गुरूंची षिकवणी आणि त्यासोबत या संग्रहाचा उपयोग केल्यास नक्कीच विद्यार्जनाचा दर्जा उंचावण्यात मदत होईल असे वाटते.

या दृकश्राव्य माध्यमाच्या ग्रंथालयाची उभारणी सर्व ठिकाणी करणे अवघड आहे मात्र विविध विद्यापीठामध्ये आज कॉम्प्युटर लॅब उपलब्ध आहेत तिथे फक्त अषा संग्रहाची उपलब्धता करून दिल्यास, यामाध्यमातून विद्यार्जनास काहीच अडचन येणार नाही असे वाटते.

त्याचबरोबर इंटरनेटच्या माध्यमातून उपलब्ध होणारा ज्ञानसाठा देखिल याच विद्यार्जनाच्या माध्यमातून उपलब्ध करून देता येऊ शकतो. या दृष्टिकोनातून यु. जी. सी. आणि शैक्षणिक संस्था यांनी काही करण्याचे ठरवून जर या बाबतीत आणखी विस्तृत अभ्यास करण्यात सुरूवात केली आणि तंज्ञाची मते मागविली तर आषा वाटेत की संगीत जगतातले मान्यवर या संकल्पनेच्या समर्थनात आपले विचार नक्कीच व्यक्त करतील आणि संगीत विद्यार्जनाच्या नव्या अध्यायास सुरूवात होईल.

# संदर्भ –

1. संगीताचे षिक्षण – पु. ल. देषपांडे (संगीत कलाविहार जून 2006)
2. संगीत घराना अंक – मूकेष गर्ग
3. भारतीय संगीत का इतिहास – उमेष जोषी
4. मुक्त संगीत संवाद – श्रीराम संगोराम
5. संगीत षिक्षण के विविध आयाम – डॉ. कुमार ऋषितोष